भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०२/२०१७

**१) अज्ञात मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणा ऱ्या महीलेस धडक देवुन मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०५/०२/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान. यातील मृतक गोपीकाबाई डोमा मारवाडे वय ५० वर्ष, रा. चांदोरी ही येथील गाढवे पेट्रोलपंप समोरून एनएच ६ रोडने पायी जात असतांना समोरून येणा–या अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपने चालवुन मृतक ही धडक मारल्याचे फिर्यादीस फोन वर कळाल्यावरून मृतक हीस उपचार कामी सामान्य रूग्णालय भंडारा येथे भरती केले असता दि. ०६/०२/२०१७ चे ०७/०० वा. उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४ (अ) भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. किचक पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) घराचा समोरील कोंडा तोडुन आत प्रवेश करुन सोन्याची चैन व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक ०१/२/२०१७ चे १०.०० ते ६/०२/२०१७ चे ११.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी माखंडचंद्र जोगेश डे वय ७५ वर्ष, रा. सुयोग नगर राजेदहेगाव हा आपले मुलाचे साक्षगंधाचे कार्यक्रमाकरीता रायपुर येथे गेले असता यातील कोणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराचा कुलुप, कोंडा तोडुन आत प्रवेश करुन बेडरुममधील लोखंडी गोदरेज आलमारीचा ताला तोडुन त्यात ठेवलेली सोन्याची चैन १२ ग्रॅम, व नगदी ३,०००/–रु. असा एकुण १३,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आडे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन काठीने डोक्यावर मारुन शिविगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक ०६/०२/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान. यातील तीनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व त्याचे वडीलासोबत तोंडा तोंडी भांडण करुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे डोक्यावर डावे बाजुला काठीने मारुन जखमी केले व शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी प्रणय दिलीप बन्सोड वय १८ वर्ष, रा. चुन्हाड यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) सार्वजनिक रस्त्यावर मोटार सायकलवर चौबलसीट बसवुन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

**अ)** दिनांक ०६/०२/२०१७ चे १२.१५ वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. ३६ टी ५३८८ चा चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल वर चौबलसीट (४ इसम) बसवुन पवनी ते निलज कडे जात असतांना भरधाव वेगाने व हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालवितांना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भादंवी. सहकलम ३/१८१ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०६/०२/२०१७ चे १२.१५ वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. ३६ व्ही ६४५४ चा चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल वर चौबलसीट (४ इसम) बसवुन पवनी ते निलज कडे जात असतांना भरधाव वेगाने व हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालवितांना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भादंवी. सहकलम ३/१८१,५/१८०,५०(१) मोवाका अन्वये. गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०६/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. मोहाडी, वरठी व पालांदुर येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन ०५ हातभट्टी दारु किंमती ३५०/–रु. तसेच जुगारातुन किंमती २१०६ रु–/ असा एकुण किंमती २,४५६/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.